04-03-2025-Dai-01_DH_PAN_01_04_2016-1.qxp 03/03/2025 11:17 PM Page 1



काणकोण एप्रिल-मे महिन्यात 'टँकरमुक्त' होणार पान ३ वर

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

www.dainikherald.com

# दैनिक हेराल्ड



भारत-ऑस्ट्रेलियामध्ये आज महामुकाबला पान ४ वर

वेर्णा, मंगळवार, ४ मार्च २०२५ | पाने ४ | ₹ ४ | REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 180 | Verna, | facebook.com/dainikherald | Tuesday 4 March 2025 | Pages 4 | ₹ 4

# ऐतिहासिक वड आणि खापरेश्वर मंदिर हटवले!

## स्थानिकांचा संताप | प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह

■ टीम दैनिक हेराल्ड :

**पर्वरी, दि. ३ : पर्वरी उड्डाणपुलाच्या बांधकामासाठी प्रशासनाने शतकानुशतके जुने वडाचे झाड तसेच भगवान खापरेश्वर मंदिरातील मूर्ती स्थलांतरित केल्याने सामाजिक कार्यकर्ते आणि भाविकांनी तीव्र निषेध व्यक्त केला आहे.**

रविवारी रात्री उशिरा कडेकोट पोलिस बंदोबस्तात ही कारवाई करण्यात आली, जी सोमवार पहाटेपर्यंत सुरू होती. मुंबई उच्च न्यायालयाने अलीकडेच वडाचे झाड स्थलांतरित करण्यास परवानगी दिली होती, मात्र आदेशात खापरेश्वर मंदिराचा उल्लेख नव्हता. यामुळे स्थानिकांमध्ये असंतोष निर्माण झाला आणि रविवारी मोठ्या संख्येने भाविक व कार्यकर्त्यांनी मंदिर हटवण्यास विरोध केला.

मंदिर हटवण्यासाठी अधिकृत कागदपत्रे सादर करण्याची मागणी निदर्शकांनी केली. मात्र, अधिकारी असा आदेश दाखवू न शकल्याने संतप्त जमावाने तीव्र विरोध दर्शवला. यामुळे संपूर्ण परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

रविवारी रात्री उशिरा, वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर, प्रशासनाने कडेकोट सुरक्षेत मूर्ती हलवण्यास सुरुवात केली. तांत्रिक अडचणीमुळे दोन तासांनी ही कारवाई थांबवण्यात आली. स्थानिकांना वाटले की त्यांचा विरोध यशस्वी ठरला, परंतु मध्यरात्रीनंतर स्थलांतर प्रक्रिया पुन्हा सुरू करण्यात आली.

अधिकाऱ्यांच्या मते, वडाचे झाड हलवण्यासाठी मोठ्या प्रमाणावर उत्खनन आवश्यक होते, जे मंदिरातील मूर्ती स्थलांतरित केल्याशिवाय शक्य नव्हते. अखेर सोमवारी पहाटे ४ वाजता भगवान खापरेश्वरची मूर्ती जेएमजे रुग्णालयाच्या परिसरात हलवण्यात आली, जिथे ती सध्या पोलिस संरक्षणाखाली ठेवण्यात आली आहे.

यानंतर ऐतिहासिक वडाचे झाड स्थलांतरित करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली. जड यंत्रसामग्रीच्या साहाय्याने फांद्या आधीच छाटण्यात आल्या होत्या, मात्र स्थलांतराच्या प्रक्रियेदरम्यान झाडाचा मुख्य खोड क्रेनच्या दडपणामुळे तुटला. यामुळे पर्यावरणतज्ज्ञांनी झाडाच्या भविष्यातील अस्तित्वाबद्दल चिंता व्यक्त केली आहे.



पर्यावरण आणि धार्मिक संघटनांनी या स्थलांतरावर तीव्र नाराजी व्यक्त केली असून, प्रशासनाच्या निर्णयावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. प्रशासनाच्या मते, झाड आणि मूर्ती स्थलांतर करणे अपरिहार्य होते, मात्र स्थानिकांचा विरोध लक्षात घेता हा वाद लवकर मिटण्याची चिन्हे दिसत नाहीत.

विशेष म्हणजे, वनस्पतिशास्त्रज्ञ डॅनियल डिसोझा हे स्थलांतराच्या वेळी उपस्थित होते. त्यांनी स्पष्ट केले की, सध्याच्या पायाभूत सुविधा इतक्या मोठ्या झाडाचे संपूर्णपणे स्थलांतर करण्यास पुरेशा नव्हत्या. त्यामुळे झाड दोन किंवा तीन भागांमध्ये विभागून वेगवेगळ्या ठिकाणी लावण्याचा प्रस्ताव मी दिला होता.

ते पुढे म्हणाले, तापमान वाढत असल्याने झाडाला तणाव टाळण्यासाठी योग्यप्रकारे संरक्षित करणे आवश्यक आहे. त्यासाठी ताडाच्या पानांसारख्या साहित्याचा वापर करून झाडाला थंड ठेवण्याची गरज आहे.

स्थानिक रहिवाशांनी आणि कार्यकर्त्यांनी प्रशासनाच्या या निर्णयावर आक्षेप घेतला असून, वडाचे झाड आणि मंदिर हटवण्याची प्रक्रिया बेकायदेशीर असल्याचा आरोप केला आहे. अनेक रहिवासी या ठिकाणाशी असलेली धार्मिक आणि भावनिक नाळ तुटल्याने व्यथित झाले आहेत.

# रोहित शर्माबाबतच्या वक्तव्यावरून वाद



**नवी दिल्ली, दि. ३ :** भारतीय क्रिकेट संघाचे कर्णधार रोहित शर्मा यांच्याबाबत झालेल्या वादग्रस्त टिप्पण्यांवर केंद्रीय क्रीडा मंत्री मनसुख मांडविया यांनी काँग्रेस आणि तृणमूल काँग्रेसच्या नेत्यांवर कठोर शब्दांत टीका केली आहे. त्यांनी या वक्तव्यांना लज्जास्पद आणि दयनीय असे संबोधले आहे.

मांडविया यांनी ' एक्स' वर पोस्ट करत म्हटले, काँग्रेस आणि तृणमूल काँग्रेसने खेळाडूंना एकटे सोडले पाहिजे. ते आपल्या व्यावसायिक जीवनाचे व्यवस्थापन करण्यास पूर्णपणे सक्षम आहेत. अशा प्रकारच्या टिप्पण्या देशाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या खेळाडूंच्या मेहनतीला आणि त्यागाला कमी लेखतात.

गेल्या आठवड्यात भारत आणि न्यूझीलंडदरम्यान झालेल्या चॅम्पियन्स ट्रॉफी सामन्यावेळी काँग्रेस नेत्या शमा मोहम्मद यांनी रोहित शर्मा यांच्याबाबत वादग्रस्त विधान केले होते. त्यांनी आपल्या पोस्टमध्ये लिहिले होते, *रोहित शर्मा हा एक खेळाडू म्हणून जाड दिसतो. त्याने वजन कमी करण्याची गरज आहे. तो आतापर्यंतच्या सर्वात कमी प्रभावशाली कर्णधारांपैकी एक आहे. या वक्तव्यावर देशभरातून तीव्र प्रतिक्रिया उमटल्या. क्रीडा क्षेत्रातील तज्ज्ञ, राजकीय नेते आणि क्रिकेटप्रेमींनी या विधानाचा निषेध केला.

भाजपने या विधानावर रोष व्यक्त करत त्याला देशविरोधी म्हटले, तर बीसीसीआयचे सचिव देवजित सैकिया यांनी हे वक्तव्य दुर्दैवी असल्याचे सांगितले. त्यांच्या मते, आयसीसीच्या मोठ्या स्पर्धेदरम्यान अशा प्रकारच्या विधानांमुळे खेळाडूंच्या मनोबलावर परिणाम होऊ शकतो.काँग्रेसने या वादात अडकू नये म्हणून शमा मोहम्मद यांची पोस्ट हटवण्यात आली. मात्र, त्यांनी आपल्या भूमिकेचा पुनरुच्चार करत म्हटले की, हे केवळ खेळाडूच्या तंदुरुस्तीबाबतचे निरीक्षण होते, शरीर लज्जास्पद करण्याचा हेतू नव्हता.

या प्रकरणात तृणमूल काँग्रेसचे नेते सौगत रॉय यांनी शमा मोहम्मद यांच्या विधानाला समर्थन दिले. त्यांनी म्हटले, रोहित शर्मा सातत्याने खराब कामगिरी करत आहे. तो क्वचितच मोठी खेळी करतो. त्याने संघात असू नये. भारत जिंकतो कारण इतर खेळाडू चांगले खेळतात, मात्र कर्णधार म्हणून त्याचे योगदान फारसे महत्त्वाचे नाही. त्यामुळे या वादाने राजकीय रंग घेतला असून क्रीडा आणि राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे.

## निवडक

### रणवीर अलाहबादियाला मोठा दिलासा

नवी दिल्ली, दि. ३ : पॉडकास्टर, यु-ट्यूबर रणवीर अलाहबादियाला दिलासा मिळाला आहे. त्याला त्याचा शो ऑन एयर करण्याची परवानगी दिली आहे. कॉमेडियन, यूट्यूबर समय रैनाचा शो इंडियाज गॉट लॅटेंट'मध्ये अश्लील कॉमेंट केल्याने रणवीर अडचणीत सापडला होता. त्याच्यावर अनेक बंधने लावण्यात होती. आता त्याला सुप्रीम कोर्टाकडून दिलासा मिळाला असून काही अटींवर शो सुरु ठेवण्यास परवानगी मिळाली आहे. पॉडकास्टर रणवीरने इंडियाज गॉट लेटेंट' या यूट्यूब शोमध्ये केलेल्या अत्यंत घाणेरड्या आणि बेताल वक्तव्यामुळे वाद निर्माण झाला. या वक्तव्यामुळे अलाहबादियाविरुद्ध अनेक एफआयआर दाखल झाले. महाराष्ट्र सायबर आणि मुंबई पोलिस विनोदी कलाकार समय रैनाच्या शोमध्ये रणवीरने केलेल्या वादग्रस्त वक्तव्याची चौकशी करत आहेत.

सोमवारी, अलाहबादिया आणि आशिष चंचलानी महाराष्ट्र सायबरसमोर स्वतंत्रपणे हजर झाले आणि त्यांनी त्यांच्या आणि इतरांविरुद्ध नोंदवलेल्या अश्लीलतेच्या प्रकरणात त्यांचे जबाब नोंदवले, अशी माहिती एका अधिकाऱ्याने दिली आहे.

-------------

### राम मंदिरावर ग्रेनेड हल्ल्याचा कट

अयोध्या, दि. ३ : हरियाणातील फरीदाबाद येथून अटक करण्यात आलेला दहशतवादी अब्दुल रहमान (१९) हा अयोध्येतील राम मंदिरावर हँड ग्रेनेडने हल्ला करण्याचा कट रचत होता. तो फैजाबादहून फरिदाबादला फक्त हँड ग्रेनेड आणण्यासाठी आला होता. त्याला परत येऊन हल्ला करायचा होता. तो हे सर्व काम पाकिस्तानी गुप्तचर संस्था आयएसआयच्या सूचनेवरून करत होता. आयएसआयच्या हँडलरने त्याला हँड ग्रेनेडही दिले होते. तो बदललेल्या नावाने फरिदाबादमध्ये लपला होता. तथापि, त्याआधी, रविवारी संध्याकाळी, डीआयजी सुनील जोशी आणि डीएसपी एसएल चौधरी यांच्या नेतृत्वाखाली गुजरात एटीएस आणि फरिदाबाद एसटीएफच्या पथकाने त्याला अटक केली. यामध्ये, इंटेलिजेंस ब्युरोकडून मिळालेल्या माहितीनेही त्याला मदत केली. जेव्हा त्याला पकडण्यात आले, तेव्हा त्याच्याकडे २ हँड ग्रेनेडही होते. ज्यांना डिफ्यूज केले होते. अटक करण्यात आलेला अब्दुल रहमान हा उत्तर प्रदेशातील फैजाबाद जिल्ह्यातील मिल्कीपूर येथील रहिवासी आहे.

-------------

### यूपीआय व्यवहारात ५ टक्क्यांनी घट

नवी दिल्ली, दि. ३ : फेब्रुवारी महिन्यात देशामध्ये १६.११ अब्ज युपीआय व्यवहार झाले असून त्यांचे मूल्य २१. ४८ लाख कोटी रुपये आहे. जानेवारीच्या तुलनेत फेब्रुवारीत यूपीआय व्यवहारांच्या संख्येत पाच टक्क्यांची घट झाली असून त्याचे मूल्य ६.५ ट क्यांनी घटले आहे. ॉजानेवारीमध्ये एकूण १६.९९ अब्ज व्यवहार झाले होते आणि त्यांचे मूल्य २३.४८ लाख कोटी रुपये होते. फेब्रुवारी २०२४ च्या तुलनेत व्यवहारांचे प्रमाण ३३ टक्के आणि मूल्य २० टक्के वाढले आहे, असे नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडियाने (एनपीसीआय) जाहीर केले आहे.

**हवामान**

कमाल : ३२ किमान : २४
आर्द्रता :६७

**बाजार भाव**

सोने : ₹ ८९,३०० (१० ग्रॅम)
चांदी : ₹१,००,१०० (१ किलो)

**शेअर मार्केट**

सेन्सेक्स : ८३,३६५ .७७ ↑ (२३१.१६ )
निफ्टी : २१,२३५.९० ↑ (८३.९५)

# औरंगजेबविषयीच्या वक्तव्यावरून नवा राजकीय वाद



**नवी दिल्ली, दि. ३ :** समाजवादी पक्षाचे (सपा) नेते अबू आझमी यांनी मुघल सम्राट औरंगजेब याच्याबाबत केलेल्या विधानामुळे महाराष्ट्राच्या राजकारणात नवा वाद निर्माण झाला आहे. आझमी यांनी औरंगजेबला क्रूर, अत्याचारी किंवा असहिष्णु शासक मानण्यास नकार दिला असून, आजकाल चित्रपटांच्या माध्यमातून मुघल सम्राटांची विकृत प्रतिमा तयार केली जात असल्याचा दावा केला आहे.

या वक्तव्यावर महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. त्यांनी आझमी यांनी आपल्या वक्तव्याबद्दल माफी मागावी आणि त्यांच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करावा, अशी मागणी केली आहे. मुंबईत पत्रकारांशी संवाद साधताना आझमी म्हणाले, औरंगजेबाविषयी चुकीची माहिती पसरवली जात आहे. त्याने हिंदूंसाठी मंदिरे बांधली होती. एका हिंदू पुजाऱ्याच्या मुलीशी लग्न करण्याचा प्रयत्न करणाऱ्या सैनिकाला त्याने हत्तीच्या पायाखाली तुडवण्याची शिक्षा दिली होती. मुस्लिमांसाठी मशिदी बांधल्या, तशीच हिंदूंसाठी मंदिरेही उभारली होती. मात्र, इतिहासाचे विकृतीकरण केले जात आहे. त्यांना विचारले असता, औरंगजेब क्रूर होता का? यावर उत्तर देताना, नाही, मला तसे वाटत नाही. अजिबात नाही, असे विधान त्यांनी केले. सपा आमदाराच्या या विधानावर शिवसेना प्रमुख आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी संतप्त प्रतिक्रिया दिली आहे. छत्रपती संभाजी महाराजांवर ४० दिवस क्रूर अत्याचार करणाऱ्या औरंगजेबाचे उदात्तीकरण करणे हे महापाप आहे. अबू आझमी यांनी माफी मागावी, असे शिंदे यांनी स्पष्ट केले. याशिवाय, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही या प्रकरणाची गंभीर दखल घेतली असून, आझमींवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे, अशी माहिती शिंदे यांनी दिली. आझमी यांचे हे विधान 'छावा ' चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतर काही आठवड्यांनी समोर आले आहे. छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवनावर आधारित या चित्रपटाचे दिग्दर्शन लक्ष्मण उतेकर यांनी केले असून, विकी कौशल यांनी संभाजी महाराजांची आणि आस्काय खन्ना यांनी औरंगजेबाची भूमिका साकारली आहे. या विधानानंतर महाराष्ट्राच्या राजकीय वातावरणात प्रचंड तणाव निर्माण झाला असून, आता आझमी पुढे काय भूमिका घेतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## कुंकळ्ळीत वाहनाच्या धडकेत पादचारी ठार

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. ३ :** कुंकळ्ळी येथे मॉर्निंग वॉकसाठी गेलेल्या संतोष नाईक (३३, रा. पायराबांध, कुंकळ्ळी) या पादचाऱ्याचा अज्ञात वाहनाने दिलेल्या धडकेत जागीच मृत्यू झाला. सोमवारी सकाळी सोक्रिकोटो देमानी येथे अपघाताची ही घटना घडली. अपघाताला कारणीभूत ठरलेल्या वाहनाने घटनास्थळापासून पळ काढला असून याप्रकरणी कुंकळ्ळी पोलिसांकडून तपास केला जात आहे. प्राप्त माहितीनुसार, कुंकळ्ळी येथे सोमवारी सकाळच्या सुमारास एका अज्ञात वाहनाने पादचाऱ्या ला धडक दिली. संतोष नाईक हे सकाळी मॉर्निंग वॉकसाठी घराबाहेर पडले होते. रस्त्यावरुन चालत असतानाच अचानक मागाहून आलेल्या वाहनाने त्यांना धडक दिली व घटनास्थळावरुन पलायन केले. संतोष नाईक हे रस्त्याच्या कडेला जखमी अवस्थेत पडून होते. यातच त्यांचा मृत्यू झाला. नागरिकांकडून याची माहिती कुंकळ्ळी पोलिसांना देण्यात आल्यानंतर त्यांनी घटनास्थळी दाखल होत पंचनामा केला. पोलिसांकडून या मार्गावरील सीसीटीव्ही फुटेजची पडताळणी केली जात असून, अपघातास कारणीभूत गाडीचा शोध घेतला जात आहे. अधिक तपास कुंकळ्ळी पोलिस करीत आहेत.

# महिलेच्या लैंगिक छळप्रकरणी युवक अटकेत

■ टीम दैनिक हेराल्ड



**पणजी, दि. ३ :** पणजी पोलिसांनी एका महिलेच्या लैंगिक छळप्रकरणी करंझाळे येथील २७ वर्षीय ग्लोन पेडणेकर याला अटक केली आहे. आरोपीवर यापूर्वीही विविध गंभीर गुन्ह्यांचे आरोप असून, तो वारंवार गुन्हे करणारा असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, २४ फेब्रुवारी रोजी रात्री सुमारे १०.३० वाजता राजधानीतील पाटो परिसरातील एका रेस्टॉरंटजवळ ही घटना घडली. पीडित महिला तिच्या मैत्रिणीसह दुचाकीवर असताना, आरोपीने दुचाकी चालवत हस्तमैथुन केले आणि अश्लील टिप्पण्या करत छळ केला. पीडितेने सोशल मीडियावर हा प्रकार उघडकीस आणल्यानंतर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली. मात्र, गुन्हा घडल्यानंतर आरोपी राज्याबाहेर पळून गेला होता.

या प्रकरणाच्या तपासासाठी पोलिस अधीक्षक (उत्तर गोवा) अक्षत कौशल, आयपीएस यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथक गठीत करण्यात आले. या पथकात पणजीचे एसडीपीओ सुदेश नाईक, आयपीएस प्रोबेशनर अरुण बालगोत्रा आणि पीआय विजय चोडणकर यांचा समावेश होता. तपासादरम्यान, आरोपी बेळगावमध्ये लपल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार, विशेष पथक बेळगावला रवाना झाले आणि तेथे त्याला ताब्यात घेण्यात आले. २ मार्च २०२५ रोजी त्याला पणजी पोलिस ठाण्यात आणण्यात आले. ग्लोन पेडणेकरवर यापूर्वीही घरफोडी, चोरी, मारहाण, महिलांवरील गुन्हेगारी बळजबरी, पाठलाग, लैंगिक छळ तसेच बालकांच्या संरक्षणासंबंधी विविध गुन्हे दाखल असल्याचे तपासात स्पष्ट झाले आहे.

# सर्वोच्च न्यायालयाकडून गोव्यातील ८५५ भूखंडांच्या रूपांतरणाला स्थगिती

## गोव्यातील जंगल नष्ट होत असल्याची न्यायालयाकडून गंभीर नोंद

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. ३ :** सर्वोच्च न्यायालयाने गोव्यातील जंगलांच्या संरक्षणासंदर्भात महत्त्वाचा आदेश देत तब्बल ८५५ सर्वेक्षण क्रमांकांच्या रूपांतरणाला अंतरिम स्थगिती दिली आहे. न्यायमूर्ती अभय एस. ओक आणि न्यायमूर्ती उज्ज्वल भुयान यांच्या खंडपीठाने सोमवारी गोव्यातील जंगल नष्ट होत असल्याची गंभीर नोंद घेतली. या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर, गोवा सरकारला न्यायमूर्ती सतीश चंद्र शर्मा यांनी आधीच सल्ला दिला होता की, कृपया गोव्याला काँक्रीटच्या जंगलात रूपांतरित करू नका.

२०१८ मध्ये वनतज्ज्ञ व्ही. टी. थॉमस आणि फ्रान्सिस्को अरौजो यांच्या नेतृत्वाखालील दोन समित्यांनी एकत्रितरित्या अहवाल सादर केला होता. या अहवालात ८५५ सर्वेक्षण क्रमांक खाजगी वन म्हणून स्पष्टपणे ओळखले गेले होते. याचिकाकर्त्यांच्या वतीने ज्येष्ठ वकील नॉर्मा अल्वारेस आणि ॲड. ओम डिकॉस्टा यांनी गोवा फाऊंडेशन या पर्यावरणवादी संस्थेच्या बाजूने युक्तिवाद केला.

८५५ भूखंडांवरील संभाव्य वृक्षतोडीबाबत न्यायालयाने चिंता व्यक्त केली. याचिकाकर्त्यांनी कोर्टात दाखवून दिले की, प्रत्यक्ष वृक्षतोड झाली नसली तरी संबंधित जमिनींचे रूपांतरण सनद जारी केली जात आहे, जी वृक्षतोडीची पूर्वतयारी मानली जाऊ शकते. याबाबतीत विशेषतः, सांकवाळ येथे भुतानी प्रकल्पाला जारी केलेली रूपांतरण सनद न्यायालयात दाखवण्यात आली. थॉमस आणि अरौजो समितीने ही जागा खाजगी वन म्हणून ओळखली होती.

न्यायालयाने निर्देश दिले की, याचिकाकर्त्यांच्या प्रार्थना कलमात नमूद केलेल्या जमिनींच्या संदर्भात पुढील कोणतेही रूपांतरण सनद जारी केली जाणार नाही. यासोबतच, राज्य सरकारला पुढील चार आठवड्यांच्या आत प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे आदेश देण्यात आले.

२०१२ मध्ये गोवा सरकारने थॉमस आणि अरौजो यांच्या नेतृत्वाखाली दोन तज्ज्ञ समित्या स्थापन केल्या होत्या. २०१८ मध्ये या समित्यांनी गोव्याच्या उत्तर व दक्षिण भागात मिळून ८.६४ चौरस किलोमीटर क्षेत्राला खाजगी वन म्हणून घोषित केले. परंतु, राज्य सरकारने पुनरावलोकन समितीमार्फत या भूखंडांच्या ओळखीवर आक्षेप घेतला आणि त्यांना तात्पुरते स्वरूपाचे मानले पाहिजे, असा आग्रह धरला. गोवा फाउंडेशनने ही बाब राष्ट्रीय हरित न्यायाधिकरण कडे नेली आणि त्यानंतर सर्वोच्च न्यायालयात अपील केले. मुख्य दिवाणी अपीलात, सर्वोच्च न्यायालयाने राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणच्या आदेशाविरोधात दाखल केलेल्या याचिकेची सुनावणी स्वीकारली आहे. याच प्रकरणातील पुढील सुनावणी २८ मार्च रोजी होणार आहे.

